


म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९३५०



REFBK-0009122
REFBK-0009122


# रेषा

वा. रा. ढवळे

# रे षा

[ स्फुट कविता ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 29249 वि: काव्य
क्रमांक 1340 नों: दि: 22/9/7४

वामन रावजी ढवळे

REFBK-0009122
REFBK-0009122

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 922

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य दोन रुपये

इ. स. १९२७ ते १९४० या कालखंडांत प्रामुख्यानें व त्यानंतर अधून मधून मी ज्या कविता लिहिल्या त्यांतील कांहीं कविता प्रस्तुत संग्रहांत समाविष्ट केल्या आहेत. हा कवितासंग्रह वस्तुतः १९४० च्या आसपास प्रसिद्ध व्हावयाचा; परन्तु अनेक कारणांमुळें तो त्यावेळीं प्रसिद्ध होऊं शकला नाहीं. तो प्रसिद्ध होण्याचा योग आज येत आहे.

ह्या संग्रहांतील बहुसंख्य कवितांचें लेखन इ. स. १९२७ ते १९४० च्या दरम्यान झालेलें असल्यामुळें, त्यांचा तोंडवळा त्या कालांतील कवितेशीं पुष्कळसा जुळणारा आहे, हें मराठी काव्य-वाचकांच्या सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

शालेय शिक्षण घेत असतांनाच कवितालेखनास मी सुरवात केली. त्यावेळेपासून आतांपर्यन्त ज्यांनीं ज्यांनीं माझ्या काव्य-लेखनाचें सहानुभूतिपूर्वक कौतुक केलें व हा काव्य-संग्रह प्रसिद्ध होण्याबद्दल आग्रह धरिला त्या सर्वांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानतों.

वा. रा. ढवळे

१२६ डी. फणसवाडी, मुंबई २
सप्टेंबर १९५६

| | |
|---|---|
| चारच ओळी | ११ |
| गुल्मोहर | १२ |
| किती जीव जिवाणूं. | १३ |
| सौन्दर्य तुझें हें | १४ |
| Bee यांस | १५ |
| तूं येणार | १६ |
| श्रीपाद कृष्ण | १७ |
| वसन्त-वैभव | १८ |
| तो काल | २० |
| वञ्चना | २३ |
| भासाचा ध्यास | २४ |
| आलीस तूं | २६ |
| आलीस तूं | २७ |
| टप टप टापा | २८ |
| गवतून गेलें बाई | २९ |
| प्रतीक्षा | ३० |
| तुझ्या माझ्या प्रीतीचें | ३२ |
| बोबडे बोल | ३३ |
| छत्रपति शिवाजी | ३४ |
| भिकारी | ३६ |
| प्रतिभेस | ३८ |
| नूतन वर्षास | ३९ |
| निन्दकास | ४० |
| अंगाई | ४१ |
| काव्य होईना | ४२ |

| | |
|---|---|
| रत्नदीप उजळले | ४३ |
| उन्नत हो हा भारत | ४४ |
| शाहीर | ४५ |
| जीवन-सन्देश | ४६ |
| तुझ्या स्कंधीं | ४८ |
| दोन वादळें | ५० |
| तुझ्या खुणा | ५२ |
| पतंगास | ५४ |
| यश तुझें | ५७ |
| रुष्ट बालक | ५८ |
| वन्दन तुज भास्करा | ५९ |
| गाणाऱ्या कवीस | ६० |
| गातसें प्यार | ६१ |

गातसें प्यार जें प्राणा – कवीचा हा असे बाणा.
हास्य तें मुग्ध कलिकेचें – कवीचें काव्य नवलाचें
हांसरी गोजिरी मूर्ति – कवीला देतसे स्फूर्ति !
नभानें पाहिली नाहीं – ईश धाता न जीवाहि
जियेची हांसरी दृष्टि – तीच प्रतिभामयी सृष्टि !
जिवाला रंगवी लोल – कवीचा स्फूर्तिचा बोल.

## चारच ओळी

चारच ओळी तुझ्या हातच्या
आज जेधवां पुन्हां वाचतों
मधुर जीवनाचीं विरलेलीं
स्वप्नें भरभर सारीं बघतों !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 292109 दि: 03/04-
क्रमांक 93780 नों: दि: 22/9/

म. ग्रं. सं. ग्रंथालय ठाणे
ग्रं. क्र. e922
ठाणे (स्थळ प्रत)

# गुल्मोहर

गुल्मोहर फुलला
इन्द्राचें ऐश्वर्य धरेवर पांघरुनी आला !

खुरटीं सगळीं झुडपें भवती
नतमस्तक तरु-राजा पुढती !
ऐटदार भरजरी गुलाबी फेटा जो त्याला !

नवपरिणित कुणि मालव-युवती
चुकुनि पातली इथें एकटी
साज नव्या नवतीचा लेवुनि लज्जित हो बाला !

हिरव्या हिरव्या वनराजीवर
कुणी पसरिला वरतुनि शेंदुर
काय कुणी वेडा प्रणयाचीं स्वप्नें फुलवित बसला ?

सांध्य मेघ हे आकाशांतुन
काय बैसले येथें येउन ?
आणि विसरले गगनीं जाया परतुनि स्वस्थानाला !

कुणीहि नटवो तुजसि तरुवरा
कुणास्तव असो ढंग साजरा
मन माझें दर्शनें तुझ्या नित बहरे नट-चंचला !

## किती जीव जिवाणूं

किति जीव जिवाणूं वीष जयांच्या मुखीं
दारुण हिंस्रता जागरूक सारखी !
परि तिथे वनश्री—हंसणारी माधुरी !
कोकीळ आणखी साथ तियेला करी !

अंधार ! धूळ उधळली, गर्जेती घन
किति भयाण होई सृष्टीचें जीवन !
द्यावया तिला उत्साह, धीर वाढता
प्रकटते हांसरी तेथें विद्युल्लता !

भोंवतीं पसरलें खारट जलधी-जल
एकाकी जीवन कंठितसे भूतल !
परि श्रमित जिवाला अवचित त्या भूतलीं
लाभते कोठुनी मधुर जलाची झरी ?

कधिं मानमान्यता नाहीं ज्याच्या कुळा
दारिद्र्य-पाश सारखा जयाच्या गळां !
कुणि कवी असा गातसे परी सुस्वर
कल्पना हृदींच्या उदात्त, चेतोहर !
हा प्रभाव कैसा ? अद्‌भुत ही योजना !
कशि कुठें दिसे दिव्यता कळेना कुणा.

## सौन्दर्य तुझें हें

सौन्दर्य तुझें हें सतत खुलें
नवजीवन हृदया म्हणुनि मिळे !

खडे कधींचे उजाड डोंगर
चरणीं त्यांच्या लोळे सागर !
मौज पाहती शशांक, भास्कर
तें चित्र सदा नयनांत खिळे !

अनन्त आकाशींचे तारे
सौन्दर्याचे मूर्त पसारे !
दिव्यत्वाचे जणूं फुलोरे !
पाहुनी तयां कवि होति खुळे !

काव्य कवीचें रसरसलेलें
गूढ गुंजनाखालीं लपलें
फूल जसें त्या पर्णांमधलें—
आनन्द मिळे करितांच खुलें.

मनीं कल्पना असोत नाना
शब्दरूप होतांच तयांना
रसिक-वृन्द डुलवितात माना
सेवुनी माधुरी हृदय खुले !

## Bee यांस

ब्रा कविराया, कुठें लोपलीं प्रतिभा-संगीतें ?
विसरलांत का इतुक्यामाजी महाराष्ट्र-माते ?
किती वेळ हें मौन धरूनी 'चांफ्या' सम बसलां ?
महाराष्ट्रशारदेवरी हा रुसवा कां धरिला ?
'मनोरंजनीं' तुझी प्रकटतां कविता रसवन्ती
कितीक रसिकांच्या हृदयांना आली नव भरती !
काय 'भ्रमर' म्हणवितां म्हणुनि का गुंजन स्वच्छन्द ?
काय लपविला कोठें सांगा प्रतिभा–मकरन्द ?
काय ग्रासते परवशता ही तव कविता-बाला ?
सूर्य का कधीं पळेल भिउनी पाहुनि तिमिराला ?
अम्लान प्रतिभेच्या कविता लिहुनी श्रमलांत ?
काय विसरलां भारत-भूचा उज्ज्वल इतिहास ?
काय पाहुनी नव-कवितेची ही हीनावस्था–
विषण्णता कविराया, आली कोमल तव चित्ता ?
काय वाटते उणीव अजुनी रसिकांची राया ?
खंड काय हा प्रतिभेला तव पडला कविराया ?
तव काव्याचें तेज फांकतां रसिकांच्या हृदयीं
महाराष्ट्र-रसिकता जाहली लीन तुझ्या पायीं !
सुरुप, सद्‌गुणी 'कमळा' तुमची, मधुर तिचें गीत
पदन्यास हळुवार तियेचा, श्रुतिहर संगीत !
रसिक तोषले, बघुनि तिचा तो डौल साभिमान
महाराष्ट्र-शारदा तुझा बघ धरिते अभिमान.
उठा, उठा कविराया, झडुं द्या तो 'डंका'-नाद
चराचरांना जागृति येउनि, उठेल प्रतिसाद !

# तूं येणार

तूं येणार म्हणूनि आज बगिचा मन्मानसींचा फुले
आशा–भृंग अनेक, गुंजन पहा आतां करूं लागले !

तूं येणार म्हणूनि सर्व दिसतें आनन्ददायी जग
तूं येणार म्हणूनि, आणि नटले चित्राकृति हे ढग !

तूं येणार म्हणूनि सर्व घर हें श्रृंगारिलें सत्वर
द्याया स्वागत रोहिणीस, सजुनी हें राहिलें अंबर !

ज्या ज्या मीं लिहिल्या कथा, कितितरी गीतें तशीं सुस्वर
तीं सारीं अवलोकनार्थ तुझिया आहेत मेजावर

आली आज कुठूनि, मन्मनिं अशी ही चेतना मंगल
जिंकाया जगतास आणि कुठुनि आलें मनीं हें बळ ?

गेलों विस्मरुनी अनंत मनिंचीं दुःखें, निराशा, भय
वज्राच्या हृदयीं न कोठुनि कळे आलें असें मार्दव ?

तूं येणार म्हणूनि, जो मम मनीं उत्साह संचारला
तूं येतांच, परंतु जाय सगळा कोठें कळेना मला.

दावा कोण असा रसज्ञ मजला, जो हो न शोकाकुल
वार्ता दुःखद ऐकुनी परि मनीं, जो राहिला निश्चल !

ज्यानें मस्तक तत्पदीं नमविलें नाहींच साश्रू-जलें
ज्याचें चित्त थरारलें न विधिच्या तीव्र प्रकोपामुळें !

काळा, लाभ तुला, कळे न मजला, रे कोणता जाहला
सारासार विचार का तुज नसे हा दुष्ट, तो चांगला ?

स्फूर्ती जेथुनि घेउनीच निघती कित्येक वागीश्वर
जो स्फूर्तिप्रद होतसे निशिदिनीं तो होय का नश्वर ?

श्रीपादा ! तव स्वागतार्थ जमती स्वर्गी कवींचे कवी
येथें मात्र विषण्णता पसरली, साहित्यिकांचे भुवीं.

गेला नर्म विनोद आज इथुनी, साक्षात् कला लोपली !
ऐसा कल्पकता-विलास फिरुनी होईल का भूतलीं ?

शोकावेग विरूनि जाइल उद्यां, जातील हेही क्षण
आणि टाकिल हें कुणी उजळुनी साहित्य-तारांगण !

(१)

सृष्टि-सतीची अनुपम शोभा नव्हे, अशी राजसा
हा असे दिव्यत्वाचा ठसा !

कवि-स्फूर्तिची सरिता मंगल, सौभाग्याची खनी !
उदेली मंगल-रस-दायिनी,

मधुराभरणें नितान्त नटुनी, हांसे कुणि बालिका
खेळवी प्रेमानें सारिकां !

वाटते कुणी ही स्वर्गीची अप्सरा
हा वेष असा घेउनियां हांसरा
प्रमुदिता पातली भू-देवी-मंदिरा !
मोद-रसाचे घुटके द्याया जगताला सुन्दरी
अवतरे धन्य अहा ! ही परी !

(२)

सृष्टीचें भांडार सर्व हें एकवटे या स्थलीं ?
होत कीं सुधा-वृष्टि भूतलीं ?

भू-विहगांची काय उदेली सुरम्य दीपावली
म्हणुनियां भू-माता हर्षली ?

स्वातंत्र्याची अमर घोषणा भाट करी सृष्टिचा ?
ओघ हा वाहे पुण्याइचा ?
पतिव्रता सति सीतेचें तेज हें ?
वा लोकप्रिय रघुरायाचें नाम हें ?
कीं असे चमकलें भरताचें प्रेम हें ?

जगतावरती नव्या दमानें नवा वेष घेउनी
येत कीं उत्फुल्लित होउनी !

( ३ )

मंगलदायी ! वैभवशाली प्रतिभादेवी अहा !
        सृष्टिच्या अंकीं खेळे पहा !

स्फूर्ती-देवी कलश घेउनी काव्य रसाचा करीं
        पातली मूर्तिमन्त वैखरी !

सुधामयी दृष्टिच्या कवे तूं जा तर जा जा झणीं
        फेड ना डोळ्यांचीं पारणीं.

तो वसन्त किंवा सृष्टीचा प्रिय सखा
तुज नसे कुणि कवे जगतीं या पारखा
मग नव्या दमानें ऊठ गड्या स्वस्थ कां?

वसन्त-वैभव अखिल जगाला रम्य अहा ! वाटतें
        तुला परी दिव्य ! दिव्य ! दिव्य ! तें.

ऐकुनी दिव्य संदेश – त्या भारत-भू-पुत्राचा
पटुनियां तयाचा मंत्र – लागला ध्यास देशाचा
स्वातंत्र्य कधीं मिळणार – ही एक जिवाला आशा
कृतनिश्चय होउनि वीर
स्वातंत्र्य–वीर रणशूर !
सत्याग्रहि बनले वीर
चालले पुढाऱ्यांमागें–जयघोष करित देशाचा

( २ )

तीं मिठागरें लढण्याला – ते काळ-पाश तोडाया
स्वातंत्र्य-विरोधक विधि ते – सज्जले वीर मोडाया.
नच कारागृह-वासाची – यत्किंचित भीती जीवा
विधि-पालक देती लत्ता
पण नित्य मनाची समता-
ठेवुनी वागली जनता
तो काल हिन्द-भूमींच्या – स्वातंत्र्य-संगरामधला.

( ३ )

तो प्रचंड जन-समुदाय – पाहुनी अहा ! जमलेला
घनशुभ्र फुलांचा लोंढा – वाटे जणुं वाहत आला !
तो लोंढा परतविण्याला – सामर्थ्य कुणाला ? बोला.
राष्ट्र-वृत्ति जागृत झाली
चैतन्य-लाट सळसळली
देशाची ओळख पटली
घेउनी ध्वजा हातांत – उतरले संगरीं वीर !

( ४ )

यमपुरीच भासत होती – तें भव्य वडाळा क्षेत्र
यम-दूत तिथें दाखविती – मृत्यूचें भेसुर चित्र !
डगमगले नाहीं कोणी – घातल्या उड्या निःशस्त्र !
रणकंदन माजे थोर
परि घेती नच माघार
सत्याग्रहि झाले शूर !
तो काल हिन्द-भूमीच्या – स्वातंत्र्य-संगरास भला.

ग्रंथ संग्रहालय ★ क्र. ९२२

( ५ )

तो लढा दोन राष्ट्रांच्या – स्वातंत्र्य स्वाभिमानाचा
तो लढा अहिंसेशीं वा – हिंसामय प्रवृत्तीचा !
तो दिमाख का शेवटचा – सर्वभौम सामर्थ्याचा ?
शरिरांशीं भाले भिडले
बन्दुकिचे फैरहि झडले !
बेभान वीर ते लढले
जणुं प्रतीक स्वातंत्र्याचें – तीं मिठागरें लुटण्याला.

( ६ )

त्या सत्याग्रहि वीरांनीं — सोशिला मार अनिवार
'जय गांधि' मुखानें केला — राष्ट्राचा जयजयकार !
निःशस्त्र लढा लढवूनी — अजरामर झाले वीर !
कितितरी कोवळे पोर
छातीचे निधड्या वीर
स्वातंत्र्य पिपासा फार
लागली म्हणूनी त्यांना — उतरले संगरीं वीर.

( ७ )

ते धन्य वीर मावळले — करुनियां जिवाची करणी.
नच मेले भरुनी उरले — राष्ट्राच्या अंतःकरणीं
सार्थक्य जिवाचें केलें — लढुनियां अतुल संग्रामीं
इतिहास तयांनीं केला
जगतास मार्ग दाखविला –
निशःस्त्र लढा लढण्याला.
तो काल हिन्दभूमीच्या – स्वातंत्र्य–संगरामधला !

( ८ )

राहील कल्पपर्यंत – ही स्मृती शूर वीरांची
चेतवील अन्तःकरणें – कित्येक हिन्द वीरांचीं
पेटवील त्यांच्या चित्तीं – चिर स्वातंत्र्याची ज्योती !
हृदयाला फुंकारोनी
चेतवील अन्तःकरणीं
तें धैर्य जितें मर्दांनी
होईल भ्याडही आतां – मर्दांहुनि मर्दचि वीर !

( ९ )

मृत वीरांवरती आतां – उभवील स्मारकें कोणी.
गातील कवी प्रेमानें – स्फूर्तिप्रद त्यांचीं गाणीं.
अनुकारिल जनता आतां – शौर्याची त्यांची करणी.
जाहले, पुढें होतील
स्वातंत्र्य-वीर नरवीर
निःशस्त्र समर-झुंजार !
तो काल हिन्द-भूमीच्या – स्वातंत्र्य संगरामधला.

## वञ्चना

लावुनी मला हळुवार लळा
कापलात माझा हाय ! गळा.

मधुर मधुर प्रणयाचीं वचनें
दिलीं घेतलीं स्निग्धपणानें
जीवित गणिलें मधुर चान्दणें !
जाळिती अतां अनुताप–झळा !

मनीं भावना तुडुंब भरल्या,
तशा कल्पना किती तरळल्या.
हाय ! अतां त्या साऱ्या विरल्या
जाहला मनाचा शुष्क मळा !

उधाण खाडीच्या भरतीवर
डोले नौका चाले झरझर
परि ओसरतां भरतीचा भर
राहते फसोनी ती अबला !

भयाण दिसतें भावी जीवन
आतां कुठलें जिवन्त मीपण ?
प्रेम फुलवि एकदांच जीवन !
लागल्या जिवाला सतत कळा !

## भासाचा ध्यास

तूं कोण अशी सौन्दर्यखनी ?
लाविलास चटका मज रमणी !

वेष तुझा साधाच खरा
परि तेज मोतियांचें नयनीं

तव कुंतल हे मृदु रेशिमसे
विलसत वाटे मधु रजनी !
आणि चंद्रिका वदनाची
रम्य हांसते त्यामधुनी !

मधुर मधुर तव मुग्धपणा
बोलबोलवी मदिय मना.
अजब तुझी जादूच खरी
संजीवनि राहे भरुनी !

तूं काय विधीची कल्पकता ?
मूर्तिमन्त कीं शालिनता ?
सृष्टि-सतीची प्रेमलता
काय अशी येई फुलुनी !

आद्य ऋषींची अनुभूती,
सकल सत्कवींची स्फूर्ती
येत अहा अवनीवरती
रूप तुझें हें नव धरुनी !

तूं कमलदलांची कोमलता !
दिव्य कवीची वा कविता !
भाव मधुर फुलतां फुलतां
प्रकट जाहली या भुवनीं.

दिसलीस एकदां मृगनयना
भारिलेंस परि तूं मम नयना
    असशील कुठें न कळे रमणी
    परि हृदय येतसे खळबळुनी !

## आलीस तूं

आलीस तूं हलकेच
मला भेटायला सखे.
तुझ्या डोळ्यांतील भाव
होते अस्थिर सारखे.

होतें तुडुंब भरलें
मन तुझें भावनांनीं.
सारें गुपीत फोडिलें
मला तुझ्या लोचनांनीं !

'हो- का '- यंत्र पण कुठें
होतें माझें माझ्यापाशीं ?
जीवनाचा मार्ग आतां
धुंडाळितों अवकाशीं !

## आलीस तूं

आलीस तूं नी शमली
  माझ्या मनांतिल वादळें
नैराश्य तें हरिणीपदें
  अन् कोठल्या कोठें पळे !

या वाळवंटीं चाललों–
होतों प्रवासी एकटा
  अंधारुनी गेलें मन,
  दृष्टींत होती शून्यता !

तेजाळल्या दाही दिशा
चैतन्य अंगीं ये नवें
  आलीस तूं, मज वाटलें
  चोहींकडे जग हो नवें !

## टप टप टापा

टप टप टापा कानीं येती
देवि काय ती स्वातंत्र्याची, रथांतुनी येते ?
नव्हे ते रणगाडे फिरती !

ऐकू येती कुठुनी गीतें ?
स्वातंत्र्याची ललकारी का जनता ही देते ?
नव्हे त्या रणभेरी झडती !

क्रान्तीची ही पहांट फुलते
गुलाल उधळित क्रान्ति-देवता ये अवनीवरती !
नव्हे, तोफांची सरबत्ती ?

मानवतेची चाहुल दिसते
शान्ति-दूत हे निर्भयतेचा पुकार का करिती ?
नव्हे. संग्राम ! सैन्य भरती !!

## गवतून गेलें बाई

गवतून गेलें बाई
कसें सारें माळरान
वेलीवेलींचें जीवन
आणि आलें बहरून !

अमृताचा शिडकाव
केला कसा पावसानें
वठलेल्या बुंधाऱ्यांना
आलीं पहा फुलें, पानें.

वसुधेच्या अंकावर
खेळ खेळती निर्झर
धरा-जीवनाला येई
सौभाग्याचा हा बहर !

अगतिकां गती आली
चेतना ये जडतेला
कणकण जागोजाग
स्निग्धतेनें डंवरला !

रणरण जीवनाची-
माझ्या, किती चालायाची ?
अमृताची बरसात
सांग केव्हां ग व्हायाची ?

# प्रतीक्षा

—आणि कुसुमानें एकलें फुलावें
पूर्ण चन्द्रानें एकलें हंसावें,
तशी बाला, सौन्दर्य मूर्तिमन्त !
वाट कोणाची पाहते सचिन्त !

जणूं विधिच्या तेजाळ कल्पनेचें
रम्य चेतोहर दिव्य ध्येय साचें !
काय कविता प्रतिभेस भाळणारी
मला वाटे हें दिव्य रूप ल्याली !

काय उधळी माधुर्य हें वसन्त ?
उषा-देवी-सौन्दर्य हें नितान्त ?
आणि मंगल जें पृथ्वितलामाजी
मधुर संगम त्याचाच होय आजी

काय जगतांतिल वस्तु-जात तेज
एकवटलें तद्रूप हेंच आज ?
काय श्रीहरिच्या मधुर बांसरीचे
सूर उठती, हें मूर्त रूप त्यांचें ?

—अशी बाला सौन्दर्यरूप खाणी
कवि-प्रतिभेची गुंग होय वाणी !
जिला बघतां नलिनीस लाज वाटे !
चंद्रिकेचाही गर्व पार आटे !

हात ठेवुनि आरक्त निज कपोलीं
जणूं शोभे कमनीय धनु खगोलीं !
कृष्ण केंसावर मोगरा विलासे
मेघमंडलिं जणु चन्द्रकोर हांसे !

कुणा सुभगाची वाट पाहते ही
जणूं चातक जल--वृष्टितेंच बाही !
टाकि दुःखाचे केधवां उसासे
कधीं वारा हालतां उठुनि बैसे.

नाद झंकारहि हस्त-कंकणांचा
तोष देई स्वन मधुर त्या पिकांचा !
नेत्र विस्फारुनि मार्ग एक लक्षी
जणूं प्रतिभामय कवी काव्य लक्षी !

" आज येतों मी परतुनी घराला " –
पत्र कोणाचें तोषवी तियेला ?
मुदित वदनावर टवटवी फुलांची
मार्ग रोखोनी बैसली रवीची !

## तुझ्या माझ्या प्रीतीचें

तुझ्या माझ्या प्रीतीचें ग
फडकवूं ये निशाण
जगा साऱ्या कळूं दे ना
आपुलें हें संमीलन !

गिरीएवढीं बंधनें
उल्लंघुनी आलों येथें
संकटांचे महापूर
घालूनियां ग पालथे.

अन्तरींचे दीप होते
सारखे ग तेजाळत
मार्ग अपुला त्यामुळें
झाला सखे प्रकाशित !

चाललीस जेव्हां पुढें
आणि येतां मी मागुनी
हेटाळणी का थोडकी
चाले सखे हें पाहुनी !

भोंवती कल्लोळ झाला
जणूं भडकावी चिता !
धूळ बैसेल ही सारी
जेथल्या तेथेंच आतां.

धीर द्याया तुला, मला
विश्व सगळें लोटलें
विरोधाचे सूर केव्हां
असतील मन्दावले !

लाख मोल घडीचें
चल करूं ग स्वागत !
सृष्टि नाचते, हांसते
प्रेमगीत गाई वात.

## बोबडे बोल

हृदय-राजसा, बोल बोबडे खुल्या दिलाचे बोल
उत्साहानें, मधुराशेनें भरलेले जे खोल.

संसाराची अमित यातना तव बोलांचे नादीं
विलय पाउं दे आणिं निवटूं दे हृत्‌चिन्तेची आधी.

हृत्फलकावर उषा उदेली बोल-रवी येतांना
आशेचीं मधु सुमनें फुलती नटवा रंग न त्यांना.

सवितांशु प्रिय जगता देतो नानाविध रंगांतें !
मधु आशेचे बोल तुझे हे देती रस-रंगातें.

दिव्य तारका सौन्दर्यानें गगनाला भूषविती !
बोल बोबडे प्रेमळ तैसे हृदयाला तोषविती.

संसाराचें सौख्य एकलें-गोड तुझे हे बोल !
हंसरे, प्रेमळ बोल बोबडे हृदय-राजिवा बोल !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २१२५१ ..... वि: .... क्रा१८५
क्रमांक ......९३४० ..... नों: दि: ..२२।१



रे. ३

# छत्रपति शिवाजी

[ पुणें येथील शिवाजीच्या पुतळ्याचें तोंड सिंहगड किल्ल्याकडे आहे. प्रस्तुत कवितेंत सिंहगडरूपी बालक प्रतापगडावरील आई भवानीला शिवाजीच्या मूकतेबद्दल प्रश्न विचारीत आहे असा प्रसंग. ]

कां सांग उभा आई, शिवा राही ?
कां काय कुणाच्या अपशकुनानें दौडत हा नाहीं ?

पोशाख नीट घालूनी
समशेर करीं घेऊनी
मंदील शिरीं खोऊनी
परि घोड्यावरती स्वार होउनी असा कां ग राही ?

तिष्ठतो कधींपासूनी
हा असाच एका स्थानीं
परि बोले नच कधिं वदनीं
हा खिन्नवदन कां दिसे कधींचा सांग झणीं आई ?

पातलें युद्ध घनघोर ?
कीं गो-वध हो अनिवार ?
समरांत पडे कुणि वीर ?
तें ऐकतांच का म्लान होउनी असा उभा राही ?

पाहुनी मावळे वीर
जाहले आज हतवीर्य
लोपले समर-झुंजार
ही अशी अनास्था पाहुनि नयनीं खिन्न काय होई ?

सन्देश कोणते द्यावे,
जित राष्ट्र कसें उठवावें,
स्वातंत्र्य कसें मिळवावें,
हे काय चालले विचार आई, शिवबाच्या हृदयीं ?

तळपते करीं तलवार
पण दिसतो अजुनी स्थीर
डोळ्यांत चकाके नीर !
ही काय शांतता तुफान होण्यापूर्वीची, आई ?

**भिकारी** " द्या हो पैसा – प्रभु राम तुम्हां दे तैसा "

**वहीण** भिकारी आला – पैसा दे म्हणतो मजला.
वेष पहा तो कसा बावळा
डोळ्यानें तर दिसे आंधळा
केविलवाणें म्हणतो मजला
द्या हो पैसा – प्रभु राम तुम्हां दे तैसा "

**भाऊ** नीघ येथुनी चल जा दूर.
नाहीं आम्हीं कुणी कुबेर,
लक्ष्मीचें नच हें माहेर
नीघ येथून – वा देइन लाथाडून !

**वहीण** असें काय रे भाऊ करिशी ?
गरिब बिचारा असे उपाशी
काय बोलसी भडभड त्यासी
गरिब बिचारा – का नसे कुठे त्या थारा

चिरंजीव तो दत्त प्रभूजी
सदैव फिरतो जगतामाजी
असें सांगते ना रे आजी ?
तोच असेल – प्रभु आम्हांवर कोपेल

सत्त्व आमुचें दत्त घेतसे,
कधीं भिकारी-मिषें येतसे,
ओंगळवाणा कधीं होतसे.
दत्त भिकारी – तो असेल आला दारीं !

शब्द ऐकुनी हे बहिणीचे
खुल्या दिलाचे, भक्तिरसाचे
आणि भाबड्या शालिनतेचे
भाऊ गहिवरला—ओढिलें जवळ बहिणीला.

**भाऊ** जा जा नेउनि दे हा पैसा
दीन भिकारी तुला दत्तसा
नमस्कार कर दे मग पैसा.

**भिकारी** " मिळाला पैसा—प्रभु राम तुम्हां दे तैसा. "

# प्रतिभेस

थांब जरा क्षणभर सखये, अचल तूं समोर
मला आज लिहिणें आहे काव्य जोमदार !

किती वेळ तन्मयतेनें ध्यान तव करावें ?
किती वेळ अन्तःकरणीं रूप तव बघावें ?
किती वेळ गुण-गानाचे ताल तव धरावे ?
प्रकट होय तूं चवथीची आज चन्द्रकोर

तुझा रंग पाहुनि येती विविध मनिं तरंग
तुझें रूप पाहुनि धालें मदिय अन्तरंग
काव्य-सिन्धु उसळायाचा काय पूर्वरंग ?
मदिय भाव-नौकेची ना तूंच कर्णधार ?

तुझा भक्त झालों म्हणुनी हांसती कितीक !
किती आज वेडा झाला बोलती अनेक
मला मुळीं पर्वा नाहीं बोलणार लोक !

## नूतन वर्षास

ऊठ नव्या जगतांत्
राजसा, ऊठ नव्या जगतांत्.

सृष्टीदेवी मधुर हांसते
सुषमा मधुर नितांत !
नव्या दमाचे खडे बोल ते
कोकिल गाई छान्.

बकुल मोगरा विविध सुमें हीं
टवकारुनि बघ कान्
खुल्या दिलानें स्वागत करिती
होउनियां बेभान् !

शेतें पिकुनी वाट पाहती
तुझी गड्या प्रेमान्
मन्द समीरण तुला गातसे
अभिनन्दनमय गान् !

आनन्दानें तूं प्रकटावें
तुझा करूं सन्मान्
तूंच एकलें आणि असावें
केवळ सौख्य-निधान् !

बहु वर्षांना प्रार्थित आलों
दिला न कोणी कान्
तूं तरि यावें मजला द्यावें
सौख्य-सुधेचें पान् !

## निन्दकास

खुशाल घाली घाव योजुनी, असेल तितुकें बळ,
सदा परि राहिन मी निश्चळ !

खडकावर लाटा आदळती संतत
जरि असे चालला मारा अव्याहत
पण खडक होत का त्यांच्यापुढती नत ?
जरी चालली सभोंवतालीं रात्रंदिन खळखळ
सदा परि राहतसे निश्चळ !

प्राण–विघातक कटु निन्देचे जरी सोडिशी शर
फुटाया माझें हृदयान्तर

टोंचुनी राहिले हृदयाला ते शर
वाहिलें तयांतुन रक्त जरी भळभळ
पण शान्तपणानें सोशिन त्यांचा छळ
कुठेंतरी एकान्तपणें मी ढाळिन अश्रू–सरी
वदेल न हीन मदिय वैखरी

अनुतापानें दग्ध होउनी जाशिल जेव्हां मनीं
मला तूं स्मरशिल रात्रंदिनीं.

मग दिसेल माझ्या काव्याची चारुता
वानिशील माझ्या हृदयाची मुग्धता
इतुकेंच काय पण होशिल माझा सखा !
गत–स्मृती होतांच मनाला होइल बा जाचणी
राहशिल खिन्न तूंच होउनी !

# अंगाई

लडिवाळा, झोंप सुखें झोंप रे गव्या
श्रमलासी बहुतकाल मारुनी उड्या.

हास्य तुझें मधुर, बोल बोबडे तसे
हृदया तव जननीच्या लाविती पिसें
म्हणुनि काय हंसण्याचें एकसारखें ?
थांबवुनी हे चाळे, झोंप छबकड्या.

झोंके तुज देउं किती बोल, बालका ?
तुजसाठीं सुन्दरसें गीत गाउं का ?
झालें हें शान्त दान्त झोंपली धरा,
झोंप किती जागतोस अजुनि पांखरा !

चल चावट कुठला ! तूं अजुनि जागसी !
डोळे हे किल किल किल अजुनि फिरविशी !
थांब, येत बागुलबा न्यावया तुला
जारे जा. येउं नको. बाळ झोंपला.

## काव्य होईना

काव्य होईना तुझ्यानें – काव्य तैसें राहुं दे
आचरी तूं धर्म तूझा – नोकरीचा बा मुदें !
काव्य होईना तुझ्यानें – दोष हा नाहीं तुझा
कां उगा चिन्ता मनाला – हट्ट कां रे हा तुझा ?
काव्य होईना तुझ्यानें – काव्य होई कां हटें ?
शब्द गुंफोनी कसेही – काव्य हो कां चोखटें ?
काव्य होईना तुझ्यानें – दैव ही क्रीडा करी !
पूर्वपुण्यें स्थान लाभे – शारदेच्या मंदिरीं !
काव्य होईना तुझ्यानें – कां असा गासी वृथा ?
का कवी व्हाया सदाची – लागलीसे ही व्यथा ?
काव्य होईना तुझ्यानें – कां मनाला जाचणी ?
जातिवंतांनाच लाभे – काव्यदेवी मोहिनी.
काव्य होईना तुझ्यानें – अन्य का तुज काम ना ?
भूतलींचे सर्व धंदे – संपले इतुक्यांत ना.
काव्य होईना तुझ्यानें – राख ना घालीं शिरीं
ना स्मशानाची कळा – आणी जिवाच्या मंदिरीं.
काव्य होईना तुझ्यानें – जाउं दे तें बापुडें !
कां उगा भावी पिढीला – घालसी तूं सांकडें ?

## रत्नदीप उजळले !

युगायुगांचा अंधार
हळू हळू दूर सरे !
कनकाच्या तबकांत
रत्नदीप उजळले !

तेजाचा का अभिषेक
कुणी करी देवदूत !
हलकेच फुलतो का
विश्व–पुष्पाचा हा कोश ?

गूढतेचें आवरण
कवितेनें झुगारून,
ओज अन्तरंगांतलें
काय येथें मुक्त केलें ?

ध्येयपूर्तीसाठीं किंवा
रक्त ज्यांचें हो आटलें
काय तेंच उफाळून
आज येथें ओसंडलें ?

## उन्नत हो हा भारत

जा जा निःशंकपणें
घावरूं नको रे !

लपत छपत हरिण जात
निर्झर तैसेंच करित
मात्र सिंह वनिं उन्नत –
आक्रमी पथा रे

वर्षा करि अभिसिंचन
मंत्र तुला गाती घन !

'विजयी भव' आश्वासन
देइ विश्व सारें !

पूर्वेला जेविं अरुण
विद्या तुज गुणभूषण
भ्रमराला मधु गुंजन –
हृदय रिझविणारें !

विद्येनें हो भूषित
हांस, हंसव अखिल जगत.
उन्नत हो हा भारत
हीच आस बा रे !

शाहिर व्हावें — महाराष्ट्र-पवाडे गावे.
स्वातंत्र्यास्तव जे जे लढले
प्राण जयांनीं रणीं वेंचिले
तन-मन-धन सर्वस्व अर्पिलें
त्यां वन्दावें — महाराष्ट्र-पवाडे गावे.

सभोंवार मैदान मोकळें
छत्र टांगलें जणुं आभाळें !
तिथें करावे गळे मोकळे
गोंधळी व्हावें — महाराष्ट्र - पवाडे गावे

चन्द्र पाझरे डोक्यावरती
तरुण वीर बैसले सभोंतीं
जणुं राष्ट्राच्या आशा-पक्ती !
त्यां फुलवावें — महाराष्ट्र-पवाडे गावे.

थाप डफावरती मारावी.
पुन्हा तुणतुणीं हातीं घ्यावीं.
तरुण मंडळी अन् जमवावीं.
रंगुनी जावें — महाराष्ट्र-पवाडे गावे.

# जीवन-सन्देश

जणुं तीरासम तूं
कळेना कसा कुठुनि येसी ?
प्रमुदित–मन झालों
मात्र मी पाहुनियां तुजसी.

वाऱ्यावर यावा
वाहुनी मोहक सौगन्ध
आणि मनामाजी
बहरुनी जावा आनन्द !

गभीर तव दृष्टी
भाल जणुं विशाल आकाश !
तूं येतां वाटे
प्रकटला जीवन संदेश !

कोण कोठचा तूं
आणि मी कोण्या गांवींचा
जीवन-संग्रामीं
जाहला संगम भेटीचा.

निराश हृदयांत
चेतवुनि आशेची ज्योत
अरुणाची शोभा
आणिली मनो-मंदिरांत

गात्रागात्रांची
विकलता लोपे निमिषांत
नसांनसांतूनी
उसळला प्रचंड आवेश !

त्या आवेशाचा
        ध्वनि उठे चराचरांतून
जीवन-सन्देश
        लाभला त्या नादामधुन !

कुठेंहि असशील
        तेथुनी घे हा प्रणिपात
स्मृती तुझी राहे
        माझिया सदैव हृदयांत.

शब्द मोजकेच
        अजूनी निनादती कानीं
जीवन-सन्देश
        लाभला त्या नादामधुनी !

## तुझ्या स्कंधीं

तुझ्या स्कंधीं बसूनीयां
किती धुंडाळिले गांव
परन्तु थांबली नाहीं
मनाची राक्षसी हांव !

किती उंचावरी गेलों
नभाचा ठाव घ्यायाला
तिथें भांबावलों चित्तीं
ज़मे डोळ्यांपुढें सारा !

परन्तु वाटलें जावें
तुझ्यासंगें किती दूर
कळेना कोणती लागे
मनाला गोड हुरहूर !

जगाचीं बंधनें सारीं
झुगारोनी तुझ्यासाठीं
तुझ्या नादांत गुंगावें
गमे ही धन्यता मोठी.

मनाला लाभली दृष्टी
दिसे माती जणूं मोती !
निराशा अन्तरामधली
पळाली लोपली भ्रान्ती.

तिथूनी पाहिलें सारे
जगाचे रम्य देखावे
स्मृती त्यांची मना होते
पुन्हां वाटे तयां गानें.

सुचेना आणखीं कांहीं
सदा लागे तुझें ध्यान
तुझ्या पायीं सदा माझ्या
जिवाचे गुंतले प्राण !

तुला ध्यावें, महाभागे !
पुन्हां ध्यावें, पुन्हां गावें
तुझ्या त्या चक्रव्यूहाच्या
जगामाजीच रावावें !

कळेना ही तुझी जादू
असे किंवा तुझा कावा ?
क्षणाचा मोह लावूनी
सदाचा दास ठेवावा !

# दोन वादळें

[१]

जमूं लागले कभिन्न काळे मेघांचे डोंगर
लवूं लागल्या विजा भयानक काळिज हो कातर !
धो धो पाउस पडूं लागला, तया मुळीं ना खळ
वाहुं लागले गढुळ जळाचे धरणीवर ओहळ.
कड्यांकड्यांवरुनी कोसळती उच्छृंखल निर्झर
हरित तृणांच्या माना मोडुनी पडती भूमीवर !
गुरें वासरें जवळ करूनी कुडकुडतो धनगर
कुठें तरी वळचणीस राही इरलें डोईवर.
तुफान वारे सोसाट्यानें धरणीवर धांवती
वृक्षलतांशीं प्रचंड तांडव अथवा आरंभिती !
कुठें मोडलीं कडाड झाडें सागवान, नारळी
कुठें अजूनी डोलत राहे डौलानें पोफळी !
कुठें झोपड्या शाकारूनी अभिमानें मिरविती
क्षणांत जाती शेतकऱ्यांच्या विलयाला दौलती !
चहुंबाजूंनीं भीषणतेची छाया धरणीवरी
भीषणतेला साथ करी जणुं पाउस सरिवर सरी !

[२]

जमूं लागल्या खगोल-नौका घरघर चाले वर
अनल-ज्वाला तुफान मारा करिती धरणीवर.
चहूंकडे अंधार दाटला, रजनीही घाबरे !
यम-दूतांचें राज्य पाशवी अवनीवर संचरे !
कुठें पेटली आग, विषारी वायू कोठें फिरे
कुठें होउनी स्फोट धुराचे, भूतलहि हादरे !

कड्यांकड्यांवरुनी छत्रीधर वेगानें धांवती
जणुं उतराव्या काळया छाया मेघांतुन खालतीं !
भव्य गोपुरें, भव्य मंदिरें कोसळती वाडे
प्रचंड उल्कापात होय जणुं भव्य नाश चहुकडे ?
किती अर्भकें कितीक अबला होति गतप्राण
मृत्यु जणूं भूलोकावरती घाली थैमान !
भीषणतेला मधुनी भिववी कोणाचें स्फुंदन
खगोल-नौका आणि विहरती वरती रात्रंदिन !

एक वादळामागुन येई अन्नब्रम्ह ! जीवन !
नव्या जगाची काय निर्मिती होइल दुसऱ्यांतुन ?

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ८९२२

## तुझ्या खुणा

वद तुझ्या काय असणार खुणा ?
मी कसा ओळखूं तुज मरणा ?

येशिल का रे वाजत गाजत ?
मरुतासम का येशिल बरळत ?
उल्केसम किंवा तेजाळत ?
येशील कसा ? दिसशील कुणा ?
मी कसा ओळखूं तुज मरणा ?

येशिल किंवा पाताळांतुन ?
नरसिंहासम वा स्तंभांतुन ?
तडितेसम का आभाळांतुन ?
भयभीत करित अवघ्या गगना !
मी कसा ओळखूं तुज मरणा ?

घुमती घुबडें तो तव का स्वर ?
रुद्रासम का असशिल भेसुर:?
शांतिदूत कीं समर–धुरंधर ?
असशील कुणी योगी ! मरणा ?
मी कसा ओळखूं तुज मरणा ?

पाय वाजती पाचोळ्यावर
तूंचि येशि का तेथुन झरझर ?
हिमलाटेसम जाळित मोहर –
येशील करित जगतीं दैना ?
मी कसा ओळखूं तुज मरणा ?

घेउनि काळोखाची स्मरणी
तूंच बैसशी का अनुरजनीं ?
भीति, निराशा माळेंतिल मणि —
ओढिशी काय तूं पुन्हां पुन्हां ?
मी कसा ओळखूं तुज मरणा ?

कुठुनि कसा ये तिळ ना मज भय
जीवित माझें सत्य मनोमय !
नेशिल शरिरा ! मरण तेंच तव !
उरतील मात्र मम येथ खुणा !
मी कसा ओळखूं तुज मरणा ?

## पतंगास

ऊड पतंगा तूं — ऊड रे नभोवितानांत
पवनासह जा जा — सारखे झोंके वर घेत.
सरळ आणि साधी — मनोहर क्रीडा बाळांची
तशीच मज वाटे — तुझ्या या नव उड्डाणाची !
वरती जातांना — जरी तूं हेलावे घेशी
असेंच व्हायाचें — निघोनी जातां परदेशीं !
कां व्याकुळ होशी — पतंगा जा वरती राया
घेई सांवरुनी — आपुली हलणारी काया

× × ×

कुण्या गायकाची — जातसे तान नभीं उंच !
प्रतिभेची किंवा — भरारी काय असे हीच ?
वायुसुताची ही — रवीच्या बिंबावर झेंप ?
अचुक निशाणीनें — कुणि करी ही भाला-फेंक ?
प्रेषित काय कुणी — धरेचा गगना भेटाया
विद्युत्वेगानें — जातसे मंगल चिंताया ?

× × ×

उषा-समयिंचा हा — किती बघ रंग मजेदार
रंग तयासंगें — होउनी दंग पुरेपूर
विहगांची माला — पहा ही जाते गगनांत
मंगल अरुणाला — गातसे ही स्वागत-गीत !
त्यांच्याही वर जा — आपुल्या शक्ति-प्रभावानें
अरुण-देवताही — धरिल तुज हृदयीं अभिमानें
बघुनी घे नीट — उषेचे अभिनव ते रंग
उषा कशी होई — रवीच्या प्रेमानें दंग !

× × ×

डोंब नभीं झाला — तापलें विश्व सभोवार
अग्निपरागांचा — धरेवर चाले वर्षाव !
गगनाच्या शिखरीं — तळपतो त्वेषें मार्तंड
भाग्योदय-कालीं — देवही व्हावा ना धुंद ?
अदृष्टांत लपले — घाबरुनि ग्रह आणि तारे
त्यांना शोधाया — पतंगा वर जाशी का रे ?
वरती जातांना — पतंगा गगनीं वेगानें
धीर तयां देसी — काय या प्रचंड उड्डाणें ?
ग्रह आणी तारे — घाबरुनि गेले हें बघुनी
वरती जातोसी — तयांची करण्या मनधरणी ?

× × ×

शान्त मनोहर ही — पातली संध्येची वेळा
रंग नवे आले — पश्चिमा-हृदयीं आभाळा
अंबर ताऱ्यांचें — राजसा आतां उगवेल
जा वरती जा, जा — पतंगा ! दवडुं नको वेळ.
तेजोवलयांत — बैस रे गगनाच्या शिखरीं
पहा विश्व सारें — तिथूनी खालीं दूरवरी.
सृष्टीचा वास — तुला मग तुच्छ तदा वाटे
पुन्हा न परतावें — का गमे आलेल्या वाटे ?
क्षणभंगुर सारे — सुखाचे दिव्य मनोरे हे
तोच खरा ज्ञानी — जो न हें सत्य कधीं विसरे.
भावनाच सारी — जगाला सगळ्या हलवून
नवनित सौख्याचें — काढते तत्त्व हेंच जाण.
अनुभव तेथील — आणि तें ताऱ्यांचें तेज
सांठव हृदयांत — अम्हा दे त्यांचा नव साज.

× × ×

मराठी ... ठाणे. ...
अनुक्रम 29209 वि. ...
क्रमांक ... नों: दि: ...

नभांतुनीं खालीं — पतंगा अवनीवर यावें
अनुभव सहलीचे — अम्हांला आतां सांगावे.
ज्या तेजानें तूं — न्हाणिलें अपुल्या देहाला
अल्प लाभ त्याचा — पतंगा आम्हांला द्यावा.

× × ×

ऊड पतंगा तूं — ऊड रे नभोवितानांत
पवनासह जा जा — सारखे झोंके वर घेत.

## यश तुझें वाढतें

मम हृदय येतसे भरभरुनी
यश तुझें वाढतें हें बघुनी.

तुझ्या यशाचें तेज फांकलें
व्यापुनि गेलीं नभो-मंडळें
स्वप्न निराशेचें तें विरलें
दुःखदशी सरली रजनी !

तुला कवी निस्यन्द ओपिती
चित्रकार कुणि तुज भूषविती
यशोदुंदुभी वाजे जगतीं
जणुं बालरवी येई गगनीं !

उजाड धरणीच्या माळावर
कुणी रोविला अभिनव अंकुर
जीवन-सिंचन करुनी त्यावर
उभविला तरू हा त्यामधुनी !

सभोंवती निन्देची भुणभुण,
तीव्र निराशा हृदयीं साहुन
निर्धनतेचे सोसुनियां घण
तूं मार्ग काढिला त्यांमधुनी !

## रुष्ट बालक

कां सांग बालका मजवरि तूं रुसलासी ?
धरुनियां अबोला रागानें कां बघसी ?
कां कोण बोललें कठोर तुज वचनांनीं ?
अपमान साहतो काय कधीं अभिमानी ?
' लडिवाळ बाळ ! वेल्हाळ ! ' म्हणवुनी घ्यावें
एवढ्या वयीं कां हिरमुसलेंच असावें ?
आनन्द ! सौख्य-मकरन्द जयें वितरावा
तो वदन–ताटवा कोमेजुनि कां जावा ?
स्वर्गीय सौख्य-स्वप्नांत तुवां गुंगावें
त्या प्रसन्न वातावरणीं आम्हां न्यावें !
कां काय कोणते प्रश्न गूढ सोडविशी ?
कां खिन्न अकालीं सांग कशाला होशी ?
कां काय वाटली गरिबीची तुज चिन्ता
म्हणुनिया शापिलें क्रोधानें भगवन्ता !
तो क्रोध तुझा बा ! अस्तंगत रविसम का ?
पसरितो छटा तव वदनावरती ही का ?

## वन्दन तुज भास्करा

वन्दन तुज, भास्करा !
मरणिं अमर तूं रे,
तुजपुढतीं रसिक-विश्व
लीन होय सारें !

एक, एक मधुर बोल
हृदयाला करि विलोल !
हांक तुझी खोल, खोल
स्पष्ट ऐकुं ये, रे.

शब्दाशब्दांत गान
त्यांत विविध रस विलीन
नुरवितसे देहभान
वैखरी तुझी रे !

जीवन हें मम उदास
फुलविलीस त्यांत आस
नित्य नवा अभिनिवेश
भावनांस ये, रे !

मधु-संचय करुनि रोज
घट भरुनी ठेविलेस
सेवुनि मधु तोच आज
धन्य रसिक सारे !

# गाणाऱ्या कवीस

कविवरा !
धन्य तव गान
हरपवी भान !
सुखाचें स्थान,
ऐकतां वाटतो सार्थ तुझा अभिमान !

कोकिळा,
आपला गळा
करुनि मोकळा,
गात मधु गान
उभविशी तिच्यासम रम्य गीत-सोपान !

उपवनीं
जणूं कुमुदिनी
भ्रमर-गुंजनीं
डुलविते मान.
मम हृदय डोलतें परिसुनियां तव कवन !

बांसरी
वाजवी हरी
मूर्त माधुरी !
तशीं तव कवनें
मम हृदय होत उत्फुल्ल मोद-रवि-किरणें.

व्यंजना,
तरल भावना
हृदय-वेदना—
शमविती खास
तूं वेड लाविलें गड्या अखिल रसिकांस.

तारका !
दिव्य बालिका !
हृदय-हारिका
गगन हांसविती
रमणीय कल्पना काव्य तुझें भूषविती !

परिसतां
काव्य-मधुरता
मूर्त दिव्यता !
पाहुनी कवनीं
तुलनेस तुला नच अन्य कोण या भुवनीं !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्र. २१२५१ वि: का१०५
क्रमांक १३५८० नों: दि: २२।७।

## गातसें प्यार जें प्राणा

गातसें प्यार जें प्राणा – कवीचा हा असे बाणा.
हास्य तें मुग्ध कलिकेचें – कवीचें काव्य नवलाचें
हांसरी गोजिरी मूर्ति – कवीला देतसे स्फूर्ति!
नभानें पाहिली नाहीं – ईश धाता न जीचाहि
जियेची हांसरी दृष्टि – तीच प्रतिभामयी सृष्टि!
जिवाला रंगवी लोल – कवीचा स्फूर्तिचा बोल.

## पहिल्या ओळींची सूचि


| | |
|---|---|
| आलीस तूं नी शांतली | २७ |
| आलीस तूं हलकेच | २६ |
| आणि कुसुमानें एकलें फुलावें | ३० |
| ऊठ नव्या जगतांत्, राजसा | ३९ |
| ऊड, पतंगा तूं ऊड रे उंच उंच ऊड. | ५४ |
| ऐकुनी दिव्य संदेश, त्या भारतभू-पुत्राचा | २० |
| कविवरा धन्य तव गान | ५९ |
| काव्य होईना तुझ्यानें काव्य तैसें राहुं दे | ४२ |
| कां सांग उभा आई, शिवा राही | ३४ |
| कां सांग बालका, मजवरि तूं रुसलासी | ५८ |
| किति जीव जिवाणू वीष जयांच्या मुखीं | १३ |
| खुशाल घाली, घाव योजुनी | ४० |
| गवतून गेलें बाई कसें सारें माळरान | २९ |
| गातसें प्यार जें प्राणा | ६२ |
| गुल्मोहर फुलला | १२ |
| चारच ओळी तुझ्या हातच्या | ११ |
| जणुं तीरासम तूं कळेना कसा कुठुनि येसी | ४६ |
| जमूं लागले कभिन्न काळे मेघांचे डोंगर | ५० |
| जा, जा निःशंकपणें, घाबरू नको रे. | ४४ |
| टप टप टापा कानीं येती | २८ |
| तुझ्या माझ्या प्रीतीचें ग | ३२ |
| तुझ्या स्कंधीं बसूनीयां | ४८ |
| तूं कोण अशी सौन्दर्यखनी | २४ |
| तूं येणार म्हणूनि आज बगिचा | १६ |
| थांब जरा क्षणभर सखये | ३८ |

दावा कोण असा रसज्ञ मजला १७
द्या हो पैसा, प्रभुराम तुम्हां दे तैसा ३६
बा कविराया कुठें लोपलीं प्रतिभा-संगीतें. १५
मम हृदय येतसे भरभरुनी ५७
युगायुगांचा अंधार ४३
लडिवाळा झोंप सुखें झोंप रे गब्या ४१
लावुनी मला हळुवार लळा २३
वद तुझ्या काय असणार खुणा ५२
वंदन तुज भास्करा मरणिं अमर तूं रे ५९
शाहिर व्हावें, महाराष्ट्र-पवाडे गावे. ४५
सौन्दर्य तुझें हें सतत खुलें १४
सृष्टि सतीची अनुपम शोभा नव्हे अशी राजसा १८
हृदय-राजसा बोल बोबडे खुल्या दिलाचे बोल ३३



राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वाळमत.
नुक्रमांक 292.497 वि: [illegible]
मांक 93.40 नोंः दिः 22.1.9.1.50.
REFBK-0009122
REFBK-0009122
मराठी ग्रंथ ... ठाणे
वा. क. 9122

## समान्तर रेषा?

दोन महायुद्धांमधील कालखंडांतील कविता व आजची कविता ह्यांच्यांतील साम्यभेदांचा परामर्श घेतला तर ह्या दोन्ही कविता समान्तर आहेत, त्यांचा तोंडवळा एकमेकींशीं मुळींही जुळत नाहीं, असा निष्कर्ष काढणें अपरिहार्य होऊन बसतें.

पण जराही खंड पडूं न देतां महाराष्ट्र-कवि-परंपरा चालू आहे हें ध्यानांत घेऊन आजची व कालची कविता ह्यांचा मागोवा घेणें व नव्या कवितेंत पूर्वसूरींचें ऋण किती आहे ह्याचा अभ्यास रसिकांनीं व टीकाकारांनीं करणें जरूर आहे. ह्या अभ्यासाला आवश्यक असे संग्रह प्रकाशित करणें व विस्कळित रीत्या प्रसिद्ध झालेल्या कवितांना एकत्र करून सुबक स्वरूप देणें हें कार्य आम्ही करीत आहों.

| | |
|---|---|
| **अनुपमा** | |
| सोपानदेव चौधरी | २—८–० |
| **उज्ज्वला** | |
| कृ. ब. निकुम्ब | १—४–० |
| **उन्मेष आणि उद्रेक** | |
| भ. श्री. पंडित | २—८–० |
| **चंदेरी लहरी** | |
| शान्ताराम आठवले | २—८–० |
| **जीवन संगीत** | |
| बा. भ. बोरकर | १–१२–० |
| **पेर्ते व्हा** | |
| 'अनिल' | ४—०–० |
| **भरली घागर** | |
| लक्ष्मीबाई टिळक | ३—०–० |
| **भावतरंग** | |
| वा. गो. मायदेव | १—८–० |
| **भावनिर्झर** | |
| वा. गो. मायदेव | १—८–० |
| **मानस मेघ** | |
| 'गिरीश' | १—८–० |
| **जयजयवन्ती** | |
| स. अ. शुक्ल | २—८–० |
| **सावरकरांची कविता** | |
| सं. मायदेव | २—४–० |
| **स्फूर्तिनिनाद** | |
| 'काव्यविहारी' | ३—८–० |

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई